# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 14 October 2025

## Time 18.10 to 18.20

## Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – १४ ऑक्टोबर २०२५ सायंकाळी ६.१०**

****

- राज्याचं बांबू उद्योग धोरण जाहीर–१५ बांबू क्लस्टर्सची उभारणी–पाच लाखांहून जास्त रोजगार संधी
- रस्त्यांवरच्या खड्ड्यांमुळे अपघाती मृत्युप्रकरणी पीडित कुटुंबांना सहा लाख रुपये नुकसानभरपाई देण्याचे मुंबई उच्च न्यायालयाचे आदेश
- ओबीसी वित्त आणि विकास महामंडळाच्या थेट कर्ज योजना पोर्टलचं अनावरण
- डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या दिवाळीच्या सुट्यांना उद्यापासून प्रारंभ

आणि

- वेस्ट इंडीजविरुद्ध दोन कसोटी क्रिकेट सामन्यांच्या मालिकेत भारताचा निर्भेळ विजय

****

राज्याचं बांबू उद्योग धोरण २०२५ आज जाहीर करण्यात आलं. राज्य मंत्रिमंडळाच्या आजच्या बैठकीत या धोरणाला मान्यता देण्यात आली. या उद्योगासाठी ५० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यात येणार असून, यातून पाच लाखांहून जास्त रोजगार निर्माण होतील. या धोरणाअंतर्गत, राज्यात १५ समर्पित बांबू क्लस्टर्स तयार करण्यात येणार आहेत. राज्यात बांबू लागवड आणि प्रक्रिया उद्योगाला या धोरणामुळे चालना मिळणार असून, शेतकऱ्यांना नगदी पिकांसारखा आणखी एक पर्यावरणपूरक आणि शाश्वत उत्पन्न पर्याय उपलब्ध होणार आहे.

भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेल्या द पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या विकास योजनेला मंत्रिमंडळाने मान्यता दिली. संस्थेच्या मुंबई आणि

छत्रपती संभाजीनगरमधल्या नऊ शिक्षण संस्था आणि दोन वसतीगृहांचं अद्ययावतीकरण करण्यालाही मंत्रिमंडळानं आज मंजुरी दिली. या योजनांमध्ये, पाच वर्षांसाठी ५०० कोटी रुपये निधीची तरतूद करण्यात आली आहे.
मुंबई उच्च न्यायालयाच्या मुंबईसह, अपील शाखा तसंच नागपूर आणि औरंगाबाद खंडपीठांकरता गट अ ते ड संवर्गात २ हजार २२८ पदांची निर्मिती करण्याला आणि त्यासाठीच्या खर्चाच्या तरतुदीलाही मंत्रिमंडळानं आजच्या बैठकीत मान्यता दिली.

****

इंडिया मेरीटाईम वीक २०२५ च्या आयोजनाचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज मंत्रालयात एका बैठकीत सविस्तर आढावा घेतला. येत्या २७ ते ३१ ऑक्टोबरदरम्यान हा कार्यक्रम मुंबईत गोरेगाव इथे आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमासाठी केंद्र सरकारनं मुंबईत कायमचं केंद्र उभारावं, असं मुख्यमंत्र्यांनी म्हटलं आहे.

****

मुंबईत रमाबाई नगरमध्ये माता रमाबाई आंबेडकर यांचं स्मारक उभारणार असल्याची घोषणा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली असून, रमाबाई नगरातल्या क्लस्टर पुनर्विकास योजनेतून हे स्मारक उभारलं जाईल, असं सांगितलं आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते माता रमाबाई नगर आणि कामराज नगर झोपडपट्टी पुनर्विकास प्रकल्पांचं भूमीपूजन आज झालं, त्यानंतर शिंदे बोलत होते.

****

सामुदायिक वन हक्क मिळवण्यासाठी पात्र असलेल्या गावांना हे हक्क देण्यासाठी सर्व संबंधित यंत्रणांनी प्राधान्यानं कार्यवाही करावी, असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले. यासंदर्भात आज झालेल्या बैठकीत ते बोलत होते. सुमारे १७ हजार गावांपैकी फक्त ५ हजार गावांना सामुदायिक वन हक्क मिळालेले आहेत.

****

राज्यात रस्त्यांवरच्या खड्ड्यांमुळे अपघात होऊन मृत्युमुखी पडलेल्यांच्या कुटुंबांना सहा लाख रुपये नुकसानभरपाई देण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयानं आज संबंधित महानगरपालिकांना दिले. तसंच, अशा दुर्घटनांमध्ये जखमी झालेल्यांना ५० हजार ते अडीच लाख रुपयांपर्यंत नुकसानभरपाई द्यावी, असंही न्यायालयानं सांगितलं. चांगले आणि सुरक्षित रस्ते हा राज्यघटनेच्या कलम २१ अंतर्गत नागरिकांच्या जगण्याच्या हक्काचा भाग आहे, याचा पुनरुच्चारही न्यायालयानं केला.

****

राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाच्या थेट कर्ज योजनेच्या पोर्टलचं आज इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांच्या हस्ते अनावरण करण्यात आले. या पोर्टलमुळे अर्ज प्रक्रिया अधिक सुलभ आणि जलद होईल, असं सावे यांनी सांगितलं. या महामंडळांतर्गत सध्या १४ उपकंपन्या कार्यरत असून, पात्र व्यक्तींनी या योजनेचा लाभ घ्यावा, असं आवाहन सावे यांनी केलं. या योजनेअंतर्गत ओबीसी प्रवर्गातील १८ ते ५५ वयोगटातल्या पात्र व्यक्तींना एक लाख रुपयांपर्यंत थेट कर्ज दिलं जातं. आतापर्यंत तीन हजार ९२३ लाभार्थ्यांना एकूण २१ कोटी सात लाख रुपये कर्ज वाटप करण्यात आलं आहे.

****

महाविकास आघाडीच्या नेत्यांनी आज राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी चोक्कलिंगम यांची भेट घेऊन त्यांना एक निवेदन सादर केलं. निवडणूक आयोगाच्या कामकाजात अधिक पारदर्शकता आणावी आणि त्यातल्या त्रुटी दूर कराव्या, अशी मागणी या निवेदनात करण्यात आली आहे. यावेळी ज्येष्ठ नेते शरद पवार, माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, मनसे अध्यक्ष राज ठाकरे, काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात, शेकापचे जयंत पाटील, समाजवादी पक्षाचे रईस शेख यांच्यासह अनेक नेते उपस्थित होते.

****

देशातल्या एकूण कमावत्या लोकसंख्येमधे महिलांचं प्रमाण गेल्या दहा वर्षांत मोठ्या प्रमाणात वाढलं असून २०२३-२४ मधे ते ४२ टक्के झाल्याची माहिती कामगार आणि रोजगार मंत्रालयानं दिली आहे. कौशल्य, पत आणि रोजगार वाढीसाठी राबवलेल्या धोरणांमुळे महिलांचं आर्थिक समावेशन शक्य झालं असून, महिला कर्मचाऱ्यांच्या कल्याणासाठी शासन अनेक महिलाकेंद्रित उपक्रम राबवत आहे, असंही मंत्रालयाच्या पत्रकात म्हटलं आहे.

****

चालू आर्थिक वर्षात आतापर्यंत ११ लाख ८९ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त प्रत्यक्ष कर संकलन झालं आहे. गेल्या आर्थिक वर्षाच्या तुलनेत कर महसुलात ६ पूर्णांक ३३ शतांश टक्के वाढ झाल्याची माहिती प्राप्तीकर विभागानं दिली आहे.

****

निवृत्ती वेतन आणि निवृत्ती वेतनधारक कल्याण विभाग येत्या १ ते ३० नोव्हेंबर दरम्यान देशभरात चौथी डीएलसी, अर्थात संगणकीकृत हयातीच्या दाखल्यांची मोहीम राबवणार आहे. देशातले एकूण २ हजार जिल्हे आणि उप-विभागीय मुख्यालयांमध्ये ही मोहीम राबवली जाईल. या मोहिमेत निवृत्तीवेतन धारकांच्या सोयीसाठी फेस ऑथेंटिकेशन तंत्रज्ञानावर विशेष भर दिला जाणार आहे.

****

भारतात तयार होणाऱ्या तीन कफ सिरपमधे भेसळ असल्याचं जागतिक आरोग्य संघटना डब्लू.एच.ओ.नं म्हटलं आहे. यात श्री सन फार्मासुटिकल्सचं कोल्डरिफ, रेडनेक्स फार्मास्युटिकल्सचं रेस्पिफ्रेश टीआर आणि शेप फार्माच्या रिलाइफ या औषधांचा समावेश आहे. जगातल्या कोणत्याही देशात ही औषधं आढळली तर ताबडतोब त्याची माहिती संबंधित यंत्रणेनं द्यावी, असं आवाहन डब्ल्यूएचओनं केलं आहे.

****

छत्रपती संभाजीनगर इथल्या डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या दिवाळीच्या सुट्या उद्यापासून सुरू होत आहेत. १५ ऑक्टोबर ते ४ नोव्हेंबरपर्यंत दिवाळी सुट्या देण्यात आली असल्याची माहिती उप कुलसचिव डॉक्टर गणेश मंझा यांनी दिली आहे. १२ ते २८ ऑक्टोबर दरम्यान विद्यापीठ परिसर आणि धाराशिव उप परिसर इथे सुटी असणार आहे, तर प्रशासकीय विभागांना १८ ते २६ ऑक्टोबर दरम्यान नऊ दिवसाची सुटी असणार आहे.

****

वेस्ट इंडिज विरुद्धची दोन कसोटी क्रिकेट सामन्यांची मालिका भारताने दोन शून्य अशी निर्भेळ जिंकली आहे. या मालिकेत दिल्लीत झालेल्या दुसऱ्या कसोटीत भारताने आज सात गडी राखून विजय मिळवला. सामन्याच्या आजच्या पाचव्या दिवसाचा खेळ सुरु झाला तेव्हा भारताला विजयासाठी अवघ्या ५८ धावांची आवश्यकता होती. साई सुदर्शन ३९ धावांवर तर कर्णधार शुभमन गिल १३ धावांवर बाद झाला. के एल राहुलने ध्रूव जुएलच्या जोडीने विजयाला गवसणी घातली. राहुल ५८ तर ध्रूव सहा धावांवर नाबाद राहिले.

दरम्यान भारतीय संघ ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर रवाना होणार आहे. येत्या १९ तारखेपासून भारतीस संघाची ऑस्ट्रेलियासोबत तीन एकदिवसीय सामन्यांची मालिका आणि त्यानंतर पाच टी ट्वेंटी सामन्यांची मालिका होणार आहे.

****

हवामान

येत्या अठरा तारखेपर्यंत मराठवाड्यात वादळी वारा आणि मेघगर्जनांसह हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता आहे.

****